दैनिक सकाळ दि. ३० ऑगस्ट १९९२

(165)

31 ऑगस्ट ९२

# ताराराणी चित्रपटाबाबत चोख भूमिका

## महापौरांचे प्रतिपादन

**कोल्हापूर, ता. ३०** - 'शिवरायांची सून ताराराणी' या चित्रपटाबाबत कोल्हापूर महापालिका आपली भूमिका चोख बजावेल, असे आश्वासन महापौर शामराव शिंदे यांनी आज येथे दिले. जनसेवा दलाच्यावतीने गत वर्षी घेतलेल्या गणेशोत्सव देखावा स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभप्रसंगी जेष्ठ दिग्दर्शक दिनकर द. पाटील यांचा सत्कार करण्यात आला. त्यानिमित्त महापौर बोलत होते. जिल्हा पोलिसप्रमुख सुनील वैद्य यांच्या हस्ते श्री. दिनकर द. पाटील यांचा सत्कार करण्यात आला. अभिनेत्री निशिगंधा वाड यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली. अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी अजितकुमार जैन होते. यां समारंभासाठी निशिगंधा वाड ताराराणीच्या वेशभूषेत आल्या होत्या.

महापौर म्हणाले, 'करवीरच्या संस्थापिका महाराणी ताराराणी यांच्या जीवनावर चित्रपटनिर्मिती करण्याचे शिवधनुष्य श्री. दिनकर द. पाटील यांनी उचलले आहे. त्यात ते यशस्वी होतील. कोल्हापूर महापालिकेच्या बोधचिन्हात ताराराणींची प्रतिमा आहे. म्हणून त्यांच्यावरील चित्रपटासाठी सहकार्य करणे ही आमची जबाबदारी ठरते. ही जबाबदारी महापालिका चोख बजावेल. निशिगंधा वाड यांनी ताराराणीची भूमिका तन्मयतेने साकार केल्यास कोल्हापूरची जनता त्यांना ताराराणी समजून मुजरा करील.'

सत्काराला उत्तर देताना श्री. दिनकर द. पाटील यांनी 'ताराराणी' चित्रपटाच्या चित्रीकरणास सुरुवात करण्यापूर्वी आलेल्या अडचणी सांगितल्या. ते म्हणाले, 'माझे मेव्हणे शिक्षणमहर्षी व्ही. टी. पाटील यांच्या सांगण्यावरून मी चित्रपटासाठी हा विषय घेतला. चित्रपटाचा मुहूर्त ठरवला तेव्हा माझ्या खिशात पाच रुपयेही नव्हते. परंतु कोणतीही चांगली गोष्ट आपण सुरू करायची असते. तिचा शेवट परमेश्वर करीत असतो, असा माझा विश्वास आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. महाराष्ट्र शासनाने, मुंबई महापालिकेने मदत केली. कोल्हापुरात श्रीमंत शाहू छत्रपती महाराजांनी सद्भावना दाखविली आणि चित्रीकरणासाठी राजवाडा दिला. जयसिंगराव पवार यांनी लिहिलेल्या चरित्रावरून कथा बनवली.'

चित्रपटातील ही ताराराणी मुंबई, दिल्ली गाजवून अटकेपार झेंडा फडकावेल, असा विश्वास व्यक्त करून ते म्हणाले, 'चित्रपटाचा प्रीमिअर मी कोल्हापूरातच घेणार आहे. त्यासाठी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी येण्याचे मान्य केले

अभिनेत्री निशीगंधा वाड म्हणाल्या, 'ताठ कण्याच्या, ताठ बाण्याच्या, कर्तबगार अशा कोल्हापूरच्या संस्थापिका ताराराणींची भूमिका मला उभी करावयची आहे. त्यासाठी मी माझ्यापरीनें सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. आपले आशीर्वाद माझ्या पाठीशी राहावेत.'

जिल्हाधिकारी अजितकुमार जैन म्हणाले, देशात मारामारी आणि प्रेम याशिवाय काही राहीलेच नाही, असे आजच्या चित्रपटावरून दिसते. अशा परिस्थितीत दिनकर द. पाटील यांनी महत्त्वाचा विषय घेतला आहे. अशा चित्रपटांची आज देशाला गरज आहे.'

माजी महापौर दिनकरराव पाटील यांनी प्रास्ताविक केले. जिल्हा पोलिसप्रमुख सुनील वैद्य, माजी आमदार बाबूराव धारवाडे, राजू ढवळे यांची भाषणे झाली. श्री. भैय्यासाहेब परदेशी यांनी स्वागत केले. श्री. रमेश लालवाणी यांनी आभार मानले.



जनसेवादलाच्यावतीने गतवर्षी घेण्यात आलेल्या गणेशोत्सव देखावा स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ रविवारी कोल्हापुरात झाला. अभिनेत्री निशिगंधा वाड यांच्या हस्ते नंदी तरुण मंडळाच्या कार्यकर्त्यांनी प्रथम क्रमांकाचा पुरस्कार स्वीकारला. शेजारी जिल्हा पोलिसप्रमुख सुनील वैद्य, जिल्हाधिकारी अजितकुमार जैन, ज्येष्ठ दिग्दर्शक दिनकर द. पाटील, रमेश लालवाणी, बाबूराव धारवाडे, दिनकरराव पाटील आदी.